MHYA070026572018

दाखल दिनांक	:- २२/१२/२०१७
नोंदणी दिनांक	:- २२/१२/२०१७
निर्णय दिनांक	:- ०५/०५/२०२६
कालावधी	:- ०८ व. ०४ म. १३ दि.

<u>२रे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) दारव्हा जि. यवतमाळ यांचे न्यायालय</u>
(पिठासीन अधिकारी सी. आर. उमरेडकर)

भुसंपादन मामला क्र. ७५५/२०१७ **<u>निशाणी : ४२.</u>**

रामराव नारायण आडे,
वय – ३२ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. मोख, ता. दिग्रस,
जि. यवतमाळ.

<u>विरुध्द</u>

०१. महाराष्ट्र शासन मार्फत,
जिल्हाधिकारी, यवतमाळ,
जि. यवतमाळ.

०२. विशेष भुसंपादन अधिकारी,
लाभक्षेत्र, यवतमाळ,
ता. जि. यवतमाळ.

०३. कार्यकारी अभियंता,
अरुणावती प्रकल्प विभाग, दिग्रस,
ता. दिग्रस, जि. यवतमाळ. **....गैरअर्जदार.**

अर्ज:- भुसंपादन अधिनियम,१८९४ चे कलम १८ नुसार संदर्भ.

<u>काम पाहणारे विधीज्ञ:-</u>

अर्जदाराकरीता **:-** श्री. व्ही. यु. शिंदे, वकील.

गैरअर्जदार क्र.१ व २ करीता **:-** श्री. ए. एस. देशमुख, सहा. सरकारी वकील.

गैरअर्जदार क्र.३ करीता **:-** श्री. अ.अ. अलोणे, वकील.

न्या य नि र्ण य

(निकाल तारीख ०५/०५/२०२६)

१) प्रस्तुत निर्देशन अर्ज भुसंपादन अधिनियम, १८९४ चे कलम १८ नुसार संपादीत मिळकतीचा वाढीव मोबदला मिळण्याकरीता दाखल करण्यात आला आहे.

अर्जदाराची केस संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणेः-

२) अर्जदाराच्या कथनानुसार अर्जदार हा मौजे मोख, तालुका दिग्रस, जिल्हा यवतमाळ येथील शेत गट क्र.१२/२/(अ) या जमीनीचा मालक होता. अर्जदाराच्या मालकीच्या गट क्र. १२/२/(अ) मधील संपुर्ण **० हेक्टर १२ आर** शेत जमीन शासनाने भुसंपादन प्रकरण क्र.१/६५/१९८७-८८, मौजे मोख, तालुका दिग्रस, जिल्हा यवतमाळ अन्वये मोख गावाच्या पुर्नवसनाकरीता संपादीत केली आहे. भुसंपादन अधिनियमाच्या कलम ४ प्रमाणेची अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २१/०१/१९८८ रोजीच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानंतर सदरची कलम ४ प्रमाणेची अधिसुचना दिनांक ३०/१२/१९८७ रोजीच्या दैनिक ''नमोः महाराष्ट्र'' व दिनांक ३१/१२/१९८७ रोजीच्या दैनिक ''सिंहझेप'' या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर कलम ६ प्रमाणेची अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २१/०४/१९८८ रोजीच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. तसेच कलम ६ प्रमाणेची अधिसुचना दिनांक २१/०४/१९८८ रोजीच्या दैनिक ''सिंहझेप'' व दिनांक १५/०४/१९८८ रोजीच्या दैनिक ''प्रतापगडचे वारे'' या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर अर्जदारांना कलम ९ (१) व (२) प्रमाणेची नोटीस प्राप्त झाल्यावर अर्जदारांनी भुसंपादन अधिकारी यांच्याकडे सविस्तर क्लेम स्टेटमेंट दाखल केले. अर्जदाराच्या कथनानुसार भुसंपादन अधिकारी यांनी दिनांक ३०/०३/१९८९ रोजी अंतीम निवाडा पारीत

केला. सदरचा अंतीम निवाडा कलम १२(२) अन्वये अर्जदाराला दिनांक २९/०३/१९८९ रोजी अंतीम निवाडयाबाबत माहीती झाली. अर्जदाराला कलम १२(२) अन्वयेची नोटीस दिनांक २९/०३/१९८९ रोजी मिळाली. त्यानंतर अर्जदाराने विहीत मुदतीमध्ये निर्देशन अर्ज दाखल केला आहे. भुसंपादन अधिकारी यांनी त्यांच्या अंतीम निवाडयानुसार अर्जदाराच्या जमीनीला प्रती हेक्टर रुपये ११,०००/- इतका मोबदला मंजूर केला. त्यानुसार अर्जदाराच्या संपादीत जमीनीकरीता एकुण १३२०/- इतका मोबदला मंजूर करण्यात आला. भुसंपादन अधिकारी यांनी मंजूर केलेला मोबदला हा नगण्य आहे. अर्जदाराला भुसंपादन अधिकारी यांनी पारीत केलेला अंतीम निवाडा मान्य नसल्याने अर्जदाराने निषेध नोंदवुन मोबदल्याची रक्कम स्विकारली.

३) अर्जदाराचे पुढे कथन असे आहे की, मौजे मोख येथील अर्जदाराची जमीन ही अत्यंत सुपीक व गावठाणलगतची होती. अर्जदाराचे म्हणणे नुसार मंजुर करण्यात आलेली रक्कम ही अयोग्य व अत्यंत अल्पस्वरुपाची असून ती बाजाराभावाप्रमाणे योग्य नाही. भुसंपादन अधिकारी यांनी बाजारमुल्य निश्चित करते वेळी योग्य त्या बाबींचा विचार केला नाही. मोख हे गांव दिग्रस शहरापासून अत्यंत कमी अंतरावर आहे. त्यामुळे तेथील मिळकतींच्या किंमती जास्त आहेत. मोख गावी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. तसेच अर्जदाराची जमीन नांदेड नागपूर राज्य महामार्गा लगत होती. संपादीत मिळकत ही अत्यंत कसदार आणि सुपीक स्वरुपाची होती. अर्जदार त्या शेतजमीनीमधुन सोयाबिन, तुर व कापूस इत्यादी पिके घेत होता. त्यापासुन अर्जदाराला दरवर्षी दहा हजार ते पंधरा हजार प्रति एकर निव्वळ नफा होता. भुसंपादन अधिकारी यांनी मिळकतीचे ठिकाण, सुबत्ता, मिळकतीपासून मिळणारे उत्पन्न व गावात असलेल्या सोई सुविधा यांचा विचार केलेला नाही. त्यामुळे मंजूर करण्यात आलेली रक्कम ही अयोग्य आहे. अर्जदाराने संपादीत मिळकतीसाठी रु.१०,००,०००/- प्रति एकर दराने वाढीव मोबदला मिळावा यासाठी प्रस्तुत

निर्देशन दाखल केले.

४) गैरअर्जदार क. १ व २ यांनी नि.क्र.०८ प्रमाणे व गैरअर्जदार क्र. ३ यांनी निशाणी ४० वर कैफियत मांडुन निर्देशन अर्जातील बहुतांश मजकुर नाकारुन निर्देशन अर्जास जोरदार आव्हाण दिले. गैरअर्जदारांनी भुअर्जन अधिकारी यांनी दिलेल्या निवाड्याचे पुर्णतः समर्थन करतांना असे म्हणणे मांडणे केले की, तो निवाडा पारदर्शी असून कायदेशीर तरतुदींचे पालन करुन आलेल्या पुराव्यांचे आधारे पारीत केलेला आहे. अर्जदाराला संधी देऊन त्यांनी कोणत्याही प्रकाराचा पुरावा दिलेला नाही. त्यामुळे त्याला आता या निर्देशनात प्रथमच असा पुरावा देता येणार नाही. अर्जदाराने मागणी केलेले मिळकतीचे बाजारमुल्य अति उच्च असुन ते योग्य आणि वाजवी नाही. सदरचे निर्देशन मुदतीत नाही. भुसंपादन अधिकारी यांनी उपलब्ध असलेले कागदपत्रे विचारात घेउन योग्य तो मोबदला नियमाप्रमाणे अर्जदाराला दिलेला आहे. संपादीत जमीनीचा मोबदला वाढविणे बाबत कोणतीही परिस्थिती नाही. या सर्व कारणांवरुन हे निर्देशन फेटाळणेत यावे असे गैरअर्जदारांचे म्हणणे आहे.

५) दोन्ही पक्षांच्या कथनाच्या अनुषंगाने माझे पुर्वपिठिासन अधिकारी यांनी नि.०९ खाली मुद्दे निश्चित करण्यात आले. अनुवादीत वाद मुद्दे, त्यावरील माझे निष्कर्ष आणि त्यासाठीची कारणे खालील प्रमाणेः-

	मुद्दे	**निष्कर्ष**
(१)	भुसंपादन अधिकाऱ्यांनी दिलेली नुकसान भरपाई अपुरी असल्याचे आणि अधिसुचनेच्या वेळीचे बाजार भावाला अनुसरुन नसल्याचे अर्जदार सिध्द करतो काय?	...होय.
(२)	वाढीव नुकसान भरपाई मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? असल्यास काय दराने?	...होय. अंतिम आदेशाप्रमाणे.
(३)	आदेश आणि हुकूमनामा ?	....निर्देशन अर्ज

		अंशतः मंजुर.

<u>का र ण मि मां सा</u>

६) आपल्या मागणी पुष्टयर्थ अर्जदाराने त्याचे पुरावा प्रतिज्ञापत्र नि.२३ वर दाखल केले. पुरावा प्रतिज्ञापत्रामधे अर्जदाराने निर्देशन अर्जातील मजकुरांचा शपथेवर पुनरुर्चार केला. अर्जदार त्याचे मागणीपुष्टयर्थ खालील दस्तऐवजावर आपली भिस्त ठेवत आहे-

(१)	सूचनापत्राची प्रत	नि.२४.
(२)	अंतिम निवाडयाची प्रत	नि.२५.
(३)	संपादीत मिळकतीचा ७/१२ उतारे	नि.२६ व २७.
(४)	मौजे मोख येथील नकाशा	नि.२८.
(५)	भुसंपादन मामला क्र.७५६/२०१७ मधील न्यायनिर्णय.	नि.२९
(६)	मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे प्रथम अपील क्र.३४८/२००३ मधील न्यायनिर्णयाची प्रत.	नि.३०
(७)	भुसंपादन मामला क्र.९५४/१९९० मधील न्यायनिर्णय.	नि.३१
(८)	भुसंपादन मामला क्र.९५६/१९९० मधील न्यायनिर्णय.	नि.३२
(९)	मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सि.अ.क्र.५१४६-५१४७/२०१ मधील न्यायनिर्णयाची प्रत.	नि.३३

अर्जदाराने स्वतः व्यातिरीक्त इतर कोणी साक्षीदार तपासला नाही आणि पुरसिस नि.३७ व्दारे पुरावा बंद केला. विद्वान सरकारी वकीलांनी अर्जदाराचा विस्तृत उलटतपास घेतला. गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी पुरसिस नि.३८ व्दारे त्यांना पुरावा देणे नाही असे कळविले. तसेच गैरअर्जदार क्र.३ यांनी पुरसिस निशाणी ४१ वर पुरसिस दाखल करून स्वतःचा पुरावा बंद केला. दोन्ही पक्षाचा युकतीवाद ऐकला.

<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता :-</u>

७) कायदेशीर तरतुदीप्रमाणे कलम १२(२) च्या नोटीसनंतर ६ आठवडयांच्या आंत किंवा निवाड्यापासून ६ महिन्यांच्या आत निर्देशन दाखल करणे आवश्यक आहे. भूसंपादन कायदयाचे कलम ११ नुसार भूसंपादन अधिकारी यांनी अंतिम निवाडा दिनांक ३०/०३/१९८९ रोजी पारित केला. अर्जदाराच्या कथनानुसार सदर निवाडयाबाबत अर्जदाराला दिनांक २७/०३/१९८९ रोजी कळविण्यात आले. भुसंपादन अधिनियमाचे कलम १२(२) ची नोटीस नि.२४ वरुन असे दिसते की, त्याव्दारे अर्जदाराला दि. ३०/०३/१९८९ रोजी भूसंपादन अधिकारी यांचे समक्ष हजर होण्याचे कळविले होते. त्यामुळे दि. ३०/०३/१९८९ ही निवाड्याची माहीतीची तारीख गृहीत धरावी लागेल. सदर निर्देशन दि.१३/०४/१९८९ रोजी गैरअर्जदार क्र.२ यांचे समक्ष दाखल करण्यात आले. यावरुन असे दिसते की, सदर निर्देशन निवाड्याच्या माहिती पासुन सहा आठवड्याच्या आंत दाखल करण्यात आले. सबब अर्ज मुदतीत आहे.

८) निवाड्याचे प्रतिवेदन नि.२५ चे अवलोकन केले असता असे आढळून येते की, अर्जदाराच्या नांवे नोंद असलेली जमीन शेत गट क्र.१२/२अ पैकी ० हे. १२ आर. जमीन संपादीत करण्यात आली. तसेच अर्जदाराला जमीनीसाठी रु.१९०१/- मोबदला रक्कम देण्यात आला.

९) सदर प्रकरणामध्ये भुसंपादन अधिकारी यांनी भुसंपादन अधिनियमाचे कलम ४ अनुसार दि.२१/०१/१९८८ रोजी शासकीय राजपत्रात जाहिर प्रगटन केले. त्यामुळे संपादीत मिळकतीचे दि. २१/०१/१९८८ रोजीचे बाजारमुल्य निश्चित करावे लागेल. अभिलेखावर कबुल असलेली वस्तुस्थिती अशी आहे की, संपादीत शेतजमीन ही गावालगतीची होती.

१०) अर्जदाराचे मुळ अर्जातील कथन असे आहे की, तो संपादीत शेतजमीनीतुन सोयाबिन, कापुस आणि तुर ही पिके घेत होता. अर्जदाराचा पुरावा

असा आहे की, संपादीत शेतजमीनीतुन तो कापुस, तुर व सोयाबीन ही पिके घेत होता व त्यापासून दरवर्षी दहा ते पंधरा हजार प्रति एकर निव्वळ नफा होत होता. सात-बारा उतारा नि.२६ व २७ चे अवलोकन करता असे दिसुन येते की, अर्जदाराने संपादनाच्या कालावधीत कापुस व तुर हे पिक घेतली. अर्जदार म्हणतो त्याप्रमाणे त्याने पिके घेतली आणि त्यामुळे त्याला भरघोस उत्पन्न झाले असे ७/१२ उतारा नि.२६ व २७ वरुन दिसत नाही. शेत जमीनीच्या उत्पन्नाबाबत अर्जदाराने कागदोपत्री किंवा इतर काही खात्रीशीर पुरावा दिलेला नाही. असे असतांना संपादीत जमीनीचे बाजारमुल्य ठरवितांना शेतजमीनीतील उत्पन्नाचा आधार घेण्यासाठी खात्रीशीर पुरावा न्यायालयासमोर नाही.

११) संपादीत जमीनीचे बाजारमुल्य ठरविण्यासाठी अर्जदाराने तज्ञ व्यक्तीचे प्रमाणपत्र दाखल केले नाही किंवा पुरावा नोंदविला नाही. अर्जदाराने त्याचे गावातील किंवा लगतच्या गावातील शेतजमीनीच्या खरेदीविक्रीचा दाखला दिलेला नाही. परंतु अर्जदाराने त्याच्या संपादीत जमीनीचा वाढीव मोबदला निश्चीत करण्याकरीता आपली भिस्त निशाणी २९ वरील न्यायनिर्णयावर ठेवली आहे.

१२) निशाणी क्र. २९ वरील भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ७५६/२०१७ या प्रकरणातील न्यायनिर्णयाच्या सत्यप्रतीचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर न्यायनिर्णयामधील नमूद अर्जदाराची संपादीत झालेली जमीन ही मौजे मोख, तालुका दिग्रस या गावाचीच आहे व ती जमीन अरुणावती प्रकल्प पिडीतांच्या पुनर्वसनाकरीता नवीन गावठानवाढीसाठी संपादीत झालेली आहे. प्रस्तुत प्रकरणातील नमूद अर्जदाराची जमीन देखील मोख, तालुका दिग्रस गावाच्या शिवारातीलच असून अरुणावती प्रकल्प पिडीतांच्या पुनर्वसनाकरीता नवीन गावठानवाढीसाठी संपादीत झालेली आहे. यावरुन असे दिसून येते की, भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ७५६/२०१७ या प्रकरणातील नमूद अर्जदाराची संपादीत जमीन व प्रस्तुत प्रकरणातील अर्जदाराची संपादीत जमीन या दोन्ही जमीनी एकाच गावाच्या

शिवारातील आहेत व समान प्रयोजनासाठी संपादीत करण्यात आल्या आहेत. भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ७५६/२०१७ या प्रकरणातील न्यायानिर्णयानुसार हे न्यायालय या निष्कर्षास आले की, सदर न्यायनिर्णयामधील नमूद मुळ भुधारक बंडु नारायण आडे यांची संपादीत झालेली जमीन व अर्जदाराची जमीन हया एकाच प्रतीच्या होत्या. यावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणातील अर्जदाराची संपादीत झालेली जमीन व भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ७५६/२०१७ या प्रकरणातील नमूद भुधारक मयत बंडु नारायण आडे यांची संपादीत झालेली जमीन ही एकाच प्रतीची आहे.

१३) आदरणीय ***मुंबई उच्च न्यायालयाच्या बयाजी तात्या काळुंके विरुध्द महाराष्ट्र शासन, २००७(२) ऑल. एम. आर. ३१६*** या न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वानुसार एकाच गावातील समान प्रतीच्या व एकाच अधिसुचनेद्वारे समान प्रयोजनासाठी संपादीत केले ल्या शेत जमीनीला समान मोबदला देणे क्रमप्राप्त आहे.

१४) भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ७५६/२०१७ या प्रकरणातील न्यायनिर्णयामध्ये या न्यायालयाने मयत बंडु नारायण आडे या भुधारकाच्या मौजे मोख, तालुका दिग्रस, जिल्हा यवतमाळ येथील गट क्र. १२/२ब मधील शेत जमीनीचे दिनांक २१/०१/१९८८ रोजीचे म्हणजेच कलम ४ प्रमाणेच्या अधिसुचनेच्या वेळचे बाजारमुल्य रुपये ७,८०,०००/- प्रती हेक्टर इतके बाजारमुल्य निश्चित केले आहे. सदर न्यायनिर्णय वरिष्ठ न्यायालयाकडुन रद्दबातल झाला आहे असे गैरअर्जदारांचे कथन नाही. तसेच वर चर्चा केल्याप्रमाणे हातातील प्रकरणातील अर्जदाराची संपादीत झालेली जमीन व भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ७५६/२०१७ या प्रकरणातील नमूद भुधारक यांची संपादीत झालेली जमीन ही एकाच प्रतीची आहे. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते अर्जदार हा समानतेच्या तत्वानुसार निर्देशन अर्ज क्र. ७५६/२०१७ या प्रकरणातील न्यायनिवाडयाच्या आधारे वाढीव मोबदला मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे वरील नमुद सर्व कारणमिमांसा विचारात घेता

अर्जदाराच्या संपादीत जमीनीसाठी दिनांक २१/०१/१९८८ रोजीचे बाजारमुल्य रुपये ७,८०,०००/- प्रती हेक्टर इतके निश्चित करण्यात येते. करीता अर्जदार हा त्याच्या संपादीत झालेल्या जमीनीसाठी रुपये ७,८०,०००/- प्रती हेक्टर या दराने वाढीव मोबदला मिळण्यास पात्र आहे. वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, भुसंपादन अधिकारी यांनी अर्जदाराला त्याच्या संपादीत जमीनीसाठी मंजुर केलेला मोबदला हा अपुरा आहे व बाजारभावापेक्षा कमी आहे. अर्जदाराने हे सिद्ध केले आहे की, भुसंपादन अधिकारी यांनी संपादीत जमीनीसाठी मंजूर केलेला मोबदला हा अपुरा आहे व बाजारभावापेक्षा कमी आहे. त्यामुळे अर्जदार हा वाढीव मोबदला मिळण्यास हक्कदार आहे. करीता मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातः</u>-

१५) मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भात वर केले ली चर्चा व कारणमिमांसेनुसार हे स्पष्ट होते की, कलम ४ चे अधिसुचनेच्या वेळी संपादीत जमीनीचे बाजारमुल्य रुपये ७,८०,०००/- प्रती हेक्टर होते जे अर्जदाराला देण्यात आलेले नाही व अर्जदाराला अल्प मोबदला मंजुर करण्यात आला. त्यामुळे अर्जदार हा त्याच्या संपादीत झालेल्या जमीनीसाठी रुपये ७,८०,०००/- प्रती हेक्टर या दराने मोबदला मिळण्यास पात्र आहे. करीता प्रस्तुतचा भुसंपादन निर्देशन अर्ज प्रमाणशीर खर्चासह अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

(१) निर्देशन अर्ज प्रमाणशीर खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येतो.

(२) गैरअर्जदारांनी अर्जदाराला संपादीत मिळकतीसाठी म्हणजेच गट क्र.**१२/२अ पैकी ०.१२** हे. आर. यासाठी रु.७,८०,०००/- (रुपये सात लक्ष ऐंशी हजार प्रति हेक्टर) या दराने वाढीव मोबदला द्यावा.

(३) यापुर्वी भुसंपादन प्रकरण १/६५/१९८७-८८ मौजे मोख, ता. दिग्रस, जिल्हा यवतमाळ अन्वये अर्जदाराने स्विकारलेली रक्कम गैरअर्जदार यांनी

वाढीव मोबदल्यातून वजा करावी.

(४) गैरअर्जदारांनी अर्जदाराला वाढीव मोबदल्याच्या रक्कमेतून यापुर्वी भरणा केलेली रक्कम वजा केल्यानंतर कलम २३(१) अनुसार कलम ४(१) चे अधिसुचने पासून ज्या दिवशी निवाडा पारित करण्यात आला त्या तारखे पर्यंत दरसाल १२ टक्के दराने अर्जदाराला अतिरिक्त घटक/मोबदला द्यावा.

(५) गैरअर्जदारांनी अर्जदाराला भुसंपादन अधिनियम कलम २३(२) अनुसान पुर्वी भरणा केलेली रक्कम वजा करुन वाढीव मोबदल्यावर ३० टक्के दिलासा रक्कम द्यावी.

(६) गैरअर्जदारांनी अर्जदाराला वाढीव मोबदला, अतिरिक्त मोबदला आणि दिलासा रक्कमेवर ज्या तारखेला अंतिम निवाडा पारित करण्यात आला त्या तारखेपासून अर्जदाराला संपुर्ण रक्कम प्राप्त होईपर्यंत भुसंपादन अधिनियम कलम २८ नुसार पाहिल्या वर्षी द.सा.द.शे. ९ दराने व त्यानंतरच्या कालावधीसाठी द.सा.द.शे. १५ दराने व्याज द्यावे.

(७) अर्जदाराची इतर मागणी फेटाळण्यात येते.

(८) याप्रमाणे खर्चाचे देयक तयार करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

Digitally signed by CHHAYA RAMDAS UMREDKAR
Date: 2026.05.05 12:37:25 +0530

दारव्हा. (श्रीमती सी. आर. उमरेडकर)
दिनांकः-०५/०५/२०२६. २रे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
दारव्हा.